# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** भारतीय श्री विद्यानिकेतन ट्रस्ट यांनी त्यांचे शाळा इमारतीचे बांधकाम
**{स्थावर विभाग}** नव्याने करावयाचे असल्यामुळे शाळा सूरू ठेवण्याकरीता शाळेच्या समोर उपलब्ध असलेले छत्रपती शिवाजी महाराज उद्यान गुरूदेव नगर नंदनवन येथिल एकुण आठ गाळे ११ महिन्याकरीता तात्पुरत्या स्वरूपात भाडेतत्वावर देण्याबाबतचा प्रश्न विचारात घेणे.

भारतीय श्री विद्यानिकेतन ट्रस्ट यांनी त्यांचे शाळा इमारतीचे बांधकाम नव्याने करावयाचे असल्यामुळे शाळा सूरू ठेवण्याकरीता शाळेच्या समोर उपलब्ध असलेले छत्रपती शिवाजी महाराज उद्यान गुरूदेव नगर नंदनवन येथिल एकुण आठ गाळे ११ महिन्याकरीता तात्पुरत्या स्वरूपात भाडेतत्वावर मागणी केलेली आहे.

नागपूर सुधार प्रन्यासची ताबा पावती क्र. उ.अधि. / ४०२ दि. १६.०६.२०२० अन्वये गुरूदेव नगर (Water Tank) येथिल उद्यान नागपूर महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आलेले आहे. सदर उद्यानात एकुण नऊ गाळे असून एका गाळ्यात सुरक्षा रक्षक चे रूम आहे. भारतीय श्री विद्यानिकेतन ट्रस्ट यांनी एकुण आठ गाळ्याची मागणी केलेली असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ (ड) च्या तरतुदीनुसार मौजा-नागपूर शिट क्र. ३०९, न.भु.क्र. २०२ मधील एकुण आठ गाळ्याची खालील प्रमाणे आकारणी करण्यात येत आहे.

बांधकाम क्षेत्रफळ X सिध्दशिघ्र गणक दर = बांधकामाचे मुल्य
९९.४० चौ.मी. X रु. ६६,२००/- = रु. ६५,८०,२८०/-
येणाऱ्या मुल्यावर रु. ६५,८०,२८०/- X वर २ % प्रमाणे
रु. १,३१,६०६/- वार्षिक प्रमाणे
रु. १,३१,६०६/- ÷ १२ महिने
= १०,९६७/- प्रती महिना
११ महिन्याचे भाडे रू. १,२०,६३७/-

खालील अटी व शर्तीचे अधिन राहून प्रस्तावित करण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :-**

१) भारतीय श्री विद्यानिकेतन ट्रस्ट या संस्थेला द्यावयाचे झाल्यास ११ महीन्याकरीता कालावधीकरीता भाडेतत्वावर देण्यात येईल.
२) सदर संस्थेला ११ महिन्यांचे एकूण भाडे आगाऊ भरणे बंधनकारक राहील.
३) ज्या प्रयोजनासाठी वापर करणार आहेत त्यासाठी आवश्यक सक्षम प्राधिकरणाची मंजुरी घेण्याची जबाबदारी Trust ची राहील.
४) भाडेतत्वावर देण्यात आलेल्या इमारतीमध्ये पोट भाडेकरू ठेवता येणार नाही.
५) महानगरपालिकेला सदर जागा / इमारतींची आवश्यकता भासल्यास त्यास्थितीत ३० दिवसांचे पूर्व सुचनेवर जागा / इमारत परत घेण्यात येईल.
६) इमारतीच्या बांधकामात कोणत्याही प्रकारचा बांधकाम, वापर बदल करता येणार नाही. कोणत्याही प्रकारचा बांधकाम / वापर बदल आढळुन आल्यास शर्तभंग समजण्यात येवून महानगरपालिकेमार्फत तशी नोटीस देवून सदर मालमत्ता परत घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.
७) सदर जागेची व इमारतीची देखभाल व दुरुस्ती तसेच विद्युत, पाणी, साफ-सफाई याबाबतची जबाबदारी उपरोक्त संस्थेची राहील.
८) इमारत परत करण्यापुर्वी सदर संस्थेनी संयुक्त पाहणी अहवालाप्रमाणे किमान आहे त्या स्थितीत महानगरपालिकेस परत करतील. याबाबत सदर संस्थेने हमीपत्र देणे बंधनकारक राहील.

९) सदर करारनामा रू. ५००/- चे स्टॅप पेपरवर संस्थेस करणे बंधनकारक राहील.

१०) भाडेतत्वाचे कालावधी संपल्यानंतर मागणी प्रमाणे नुतनीकरण करण्याचे अधिकार महानगरपालिकाकडे राहील.

११) मुळ भाडे करारनाम्यातील अटी व शर्ती व्यतिरिक्त महानगरपालिकेस आवश्यक वाटतील त्या अतिरिक्त अटी शर्ती करारनाम्यात अंतर्भुत करण्यात येतील.

१२) उपरोक्तबाबत कोणत्याही निर्णयासंबंधीचे संपुर्ण अधिकार मा. आयुक्त यांचेकडे सुरक्षित राहील व संस्थेस बंधनकारक राहील.

उपरोक्त अटी व शर्तीचे अधिन राहुन भारतीय श्री विद्यानिकेतन ट्रस्ट यांना तात्पुरत्या स्वरूपात छत्रपती शिवाजी महाराज उद्यान गुरूदेव नगर नंदनवन येथील आठ गाळ्याचे ११ महिन्याचे भाडे रू. १,२०,६३७/- अगाऊ भाडे वसूल करून भाडेतत्वावर देण्याबाबतचा प्रश्न विचारात घेणे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 22/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 04/01/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (मालमत्ता), स्थावर विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार भारतीय श्री विद्यानिकेतन ट्रस्ट यांनी त्यांचे शाळा इमारतीचे बांधकाम नव्याने करावयाचे असल्यामुळे शाळा सूरू ठेवण्याकरीता शाळेच्या समोर उपलब्ध असलेले छत्रपती शिवाजी महाराज उद्यान गुरूदेव नगर नंदनवन येथिल एकुण आठ गाळे ११ महिन्याकरीता तात्पुरत्या स्वरूपात भाडेतत्वावर देण्याबाबतचा प्रश्न विचारात घेणे.

भारतीय श्री विद्यानिकेतन ट्रस्ट यांनी त्यांचे शाळा इमारतीचे बांधकाम नव्याने करावयाचे असल्यामुळे शाळा सूरू ठेवण्याकरीता शाळेच्या समोर उपलब्ध असलेले छत्रपती शिवाजी महाराज उद्यान गुरूदेव नगर नंदनवन येथिल एकुण आठ गाळे ११ महिन्याकरीता तात्पुरत्या स्वरूपात भाडेतत्वावर मागणी केलेली आहे.

नागपूर सुधार प्रन्यासची ताबा पावती क्र. उ.अधि. / ४०२ दि. १६.०६.२०२० अन्वये गुरूदेव नगर (Water Tank) येथिल उद्यान नागपूर महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आलेले आहे. सदर उद्यानात एकुण नऊ गाळे असून एका गाळ्यात सुरक्षा रक्षक चे रूम आहे. भारतीय श्री विद्यानिकेतन ट्रस्ट यांनी एकुण आठ गाळ्याची मागणी केलेली असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ (ड) च्या तरतुदीनुसार मौजा-नागपूर शिट क्र. ३०९, न.भु.क्र. २०२ मधील एकुण आठ गाळ्याची खालील प्रमाणे आकारणी करण्यात येत आहे.

बांधकाम क्षेत्रफळ X सिध्दशिघ्र गणक दर = बांधकामाचे मुल्य

९९.४० चौ.मी. X रु. ६६,२००/- = रु. ६५,८०,२८०/-

येणाऱ्या मुल्यावर रु. ६५,८०,२८०/- X वर २ % प्रमाणे

रु. १,३१,६०६/- वार्षिक प्रमाणे

रु. १,३१,६०६/- ÷ १२ महिने

= १०,९६७/- प्रती महिना

११ महिन्याचे भाडे रू. १,२०,६३७/-

खालील अटी व शर्तीचे अधिन राहून प्रस्तावित करण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :-**

१) भारतीय श्री विद्यानिकेतन ट्रस्ट या संस्थेला द्यावयाचे झाल्यास ११ महीन्याकरीता कालावधीकरीता भाडेतत्वावर देण्यात येईल.

२) सदर संस्थेला ११ महिन्यांचे एकूण भाडे आगाऊ भरणे बंधनकारक राहील.

३) ज्या प्रयोजनासाठी वापर करणार आहेत त्यासाठी आवश्यक सक्षम प्राधिकरणाची मंजुरी घेण्याची जबाबदारी Trust ची राहील.

४) भाडेतत्वावर देण्यात आलेल्या इमारतीमध्ये पोट भाडेकरू ठेवता येणार नाही.

५) महानगरपालिकेला सदर जागा / इमारतींची आवश्यकता भासल्यास त्यास्थितीत ३० दिवसांचे पूर्व सुचनेवर जागा / इमारत परत घेण्यात येईल.

६) इमारतीच्या बांधकामात कोणत्याही प्रकारचा बांधकाम, वापर बदल करता येणार नाही. कोणत्याही प्रकारचा बांधकाम / वापर बदल आढळुन आल्यास शर्तभंग समजण्यात येवून महानगरपालिकेमार्फत तशी नोटीस देवून सदर मालमत्ता परत घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

७) सदर जागेची व इमारतीची देखभाल व दुरुस्ती तसेच विद्युत, पाणी, साफ-सफाई याबाबतची जबाबदारी उपरोक्त संस्थेची राहील.

८) इमारत परत करण्यापुर्वी सदर संस्थेनी संयुक्त पाहणी अहवालाप्रमाणे किमान आहे त्या स्थितीत महानगरपालिकेस परत करतील. याबाबत सदर संस्थेने हमीपत्र देणे बंधनकारक राहील.

९) सदर करारनामा रू. ५००/- चे स्टॅप पेपरवर संस्थेस करणे बंधनकारक राहील.

१०) भाडेतत्वाचे कालावधी संपल्यानंतर मागणी प्रमाणे नुतनीकरण करण्याचे अधिकार महानगरपालिकाकडे राहील.

११) मुळ भाडे करारनाम्यातील अटी व शर्ती व्यतिरिक्त महानगरपालिकेस आवश्यक वाटतील त्या अतिरिक्त अटी शर्ती करारनाम्यात अंतर्भुत करण्यात येतील.

१२) उपरोक्तबाबत कोणत्याही निर्णयासंबंधीचे संपुर्ण अधिकार मा. आयुक्त यांचेकडे सुरक्षित राहील व संस्थेस बंधनकारक राहील.

उपरोक्त अटी व शर्तीचे अधिन राहुन भारतीय श्री विद्यानिकेतन ट्रस्ट यांना तात्पुरत्या स्वरूपात छत्रपती शिवाजी महाराज उद्यान गुरूदेव नगर नंदनवन येथील आठ गाळ्याचे ११ महिन्याचे भाडे रू. १,२०,६३७/- अगाऊ भाडे वसूल करून भाडेतत्वावर देण्याबाबतच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.